**प्रेसनोट दिनांक ०६/०७/२०१९**
**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे ( सीसीटीव्ही कॅमेरे वॉच ) या संकल्पने अंतर्गत येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील प्रतिक नगर भागातील व्यापारी यांना भेटून त्यांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत लेखी पत्र देवून सुरक्षिततेे संदर्भात मागदर्शन केले बाबत.**

---

मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे वॉच) या संकल्पने अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.०५/०७/२०१९ रोजी १६:०० ते १८:०० वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील प्रतिकनगर, येरवडा भागातील मुख्या रस्त्यांलगतचे व्यापारी, दुकानदार यांना भेटून त्यांना घडणारे चोरी, घरफोडी, वाहनचोरी, महिला, बालकांसंदर्भातील गुन्हे यांची माहिती देवून अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हे उघडकीस आणणेसाठी सीसीटीव्ही कॅमेरांचे महत्व पटवून देऊन सहकार्यातुन सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे वॉच प्रकल्प) या संकल्पनेची माहिती दिली. तसेच त्यांना त्यांचे दुकानामध्ये बाहेरील परिसर, रस्ता कव्हर होईल अशा रितीने सीसीटीव्ही कॅमरे बसविण्याबाबत आवाहन करून लेखी पत्र अदा केली आहेत.

अशा प्रकारे श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलीसींग, सहकार्यातून सुरक्षेकडे संकल्पने अंतर्गत येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील प्रतिकनगर, येरवडा, पुणे भागातील व्यापारी, दुकानदार यांना भेटून त्यांचे दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत लेखी पत्र देऊन व सुरक्षेबाबत मार्गदर्शन करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.












